महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमीअभिलेख (म.राज्य ) , पुणे
दूसरा व तिसरा मजला , नवीन प्रशासकीय इमारत , विधानभवन समोर , कॅम्प , पुणे
https://mahabhumi.gov.in

---

दिनांक - 21/07/2023 **HELPLINE NUMBER- 020- 25712712**

# सरळसेवा भरती 2023

## तलाठी संवर्ग
## अर्ज सादर करण्यास मुदतवाढ देण्याबाबत

महसूल विभागातील तलाठी संवर्गातील रिक्त पदे भरण्याकामी दि. 26/06/2023 पासून उमेदवारांची नोंदणी व ऑनलाईन अर्ज स्विकृतीची प्रक्रिया सुरु करण्यात आलेली आहे. जाहिरातीत नमुद केल्यानुसार ऑनलाईन अर्ज सादर करण्याकामी व ऑनलाईन शुल्क भरण्याकामी दिनांक 18/07/2023 रोजी 23.55 वा. पर्यंत मुदत देण्यात आलेली होती.

तथापि राज्यात सुरू असणाऱ्या अतिवृष्टीमुळे इंटरनेट सेवा प्रभावित झाल्याने दुर्गम भागातील (PESA क्षेत्रातील) व इतर उमेदवारांना ऑनलाईन अर्ज सादर करण्यास अडचणी निर्माण झाल्याबाबत निवेदन शासन स्तरावर प्राप्त झालेले आहेत. त्यामुळे तलाठी भरतीकामी सर्व प्रकारच्या उमेदवारांसाठी ऑनलाईन अर्ज सादर करण्याकामी व ऑनलाईन शुल्क जमा करण्याकामी पुढीलप्रमाणे मुदतवाढ देण्यात येत आहे.

| अ.क्र. | तपशील | विहीत कालावधी |
|---|---|---|
| 1 | अर्ज सादर करण्याचा कालावधी | दि. 22/07/2023 रोजी रात्री 00.05 वा. पासून<br>दि. 25/07/2023 रोजी रात्री 23.55 वा. पर्यंत |
| 2 | ऑनलाईन पद्धतीने विहीत परीक्षा शुल्क भरण्याचा अंतिम दिनांक | दि. 25/07/2023 रोजी रात्री 23.55 वा. पर्यंत |

तलाठी भरतीकामी यापुर्वी अर्ज सादर केलेल्या उमेदवारांनी पुन्हा अर्ज करण्याची आवश्यकता नाही. तसेच वरीलप्रमाणे दिलेली मुदतवाढ ही अंतिम असून यानंतर कोणत्याही परिस्थितीत मुदतवाढ देण्यात येणार नाही.

**स्वा. /- XXX**
**( आनंद रायते )** भा.प्र.से.
**राज्य परिक्षा समन्वयक तथा**
**अप्पर जमाबंदी आयुक्त आणि**
**अतिरिक्त संचालक भूमि अभिलेख,पुणे**